**कार्यालयाचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये**
**मुद्दा क्र. ०२ (दोन)**

| अ.क्र. | पदनाम | कर्तव्य | कोणत्या कायद्यानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ०१. | कार्यकारी अभियंता (विद्युत) | १) प्रभाग अंतर्गत दहा लाखांपर्यंतचे महसुली व भांडवली (विकास व देखभाल दुरुस्ती) या कामाचे अंदाजपत्रक उपअभियंता/कनिष्ठ अभियंता यांचेकडुन तयार कन घेणे, निविदा काढणे व कामाच्या प्रगतीनुसार बीले अदायगी करणे.<br>२) लाईट बील अदा करणे.<br>३) र.रु.२,००,०००/- मर्यादेपर्यंतच्या कार्यालयीन खर्चासाठी आवश्यक ती सामुग्री/सल्लागार खर्च/ संगणक साहित्य (Hardware) विकत घेणे, कामाचे आदेश देणे बील मंजुर करणे, करारनामा करणे, देयके अदा करणे.<br>४) र.रु.१०,०००/- पर्यंत वाहन इंधन बीले मंजुर करणे.<br>५) रस्त्यावरील दिवे, प्रशासकीय इमारती, शाळा, रुग्णालये, दवाखाने, इ. विद्युत कामावर नियंत्रण ठेवणे.<br>६) नागरिकांच्या तक्रारी व सुचनांवर नियमाधीन कार्यवाही करणे.<br>७) सर्व कर्मचार्यांना बेशिस्तपणाचे वर्तनाबाबत शास्ती लावणे, दंड करणे.<br>८) कोणत्याही आर्थिक हानीची रक्कम वसुलात आणणे/ठपका ठेवणे इ.करिता कारणे दाखवा नोटीस बजावणे व खुलासा मागिवणे.<br>९) ठपका ठेवणे व पुढील कार्यवाही क्षेत्रीय अधिकारी यांचेकडे प्रस्तावीत करणे. | १) प्रशा/१/कावि/७७९/१९९५ दि.३०/१०/१९९५.<br>२) प्रशा/१/कावि/७२९/२००६ दि.२१/०८/२००६.<br>३) प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दि.२९/०८/२००३.<br>४) लेखा/१/कावि/७७०/२०१३ दि.१७/०९/२०१३. | |
| ०२. | उपअभियंता (वि) | १) वर्ग ३ व ४ मधील अधिका-यांच्या किरकोळ रजा मंजूर करणे, तसेच र.रु.१०,०००/- चे स्थायी अग्रीमधन मंजूर करणे.<br>२) वर्ग ३ व ४ मधील मधील कर्मचा-यांच्या ३० दिवसांपेक्षा जास्त रजा मंजूर करणे, पूर्णवेतनी, अर्धवेतनी, परावर्तीत रजा मंजूर करणे, गोपनीय अहवालाचे (वर्ग २ व ३) पुर्नविलोकन पाठविणे.<br>३) महसुली व भांडवली कामाची बीले अदा करणे.<br>४) र.रु. ५,०००/- पर्यत कोटेशन काढणे, मंजुर करणे, कामाचे आदेश देणे, व त्यासंदर्भात | १) म.ना.से. रजा नियम, वेतन नियम, लेखासंहिता व बीपीएमसी अँक्ट १९४९ मधील तरतूदीनुसार या अधिकाराचे अंमलबजावणी करणे.<br>२) बीपीएमसी अँक्ट १९४९ चे कलम ६९ नियमानुसार मनपाने यासंदर्भात केलेले नियम व उपविधीनुसार.<br>३) एमसीएसआर (वेतन) व लेखा संहितानुसार | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आलेली बीले मंजुर करणे. | कामकाज करणे.<br>४) मा.आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र.प्रशा/०२/कावि/२७/२०१३ दि.१७/१०/२०१३ व क्र.प्रशा/०१/कावि/११७५/२०१३ दि.२८/०८/२०१३. | |
| ०३. | प्रशासन अधिकारी | १) मनपाच्या वतीने दाखल असलेल्या दाव्यांच्या संदर्भात न्यायालयात प्रतिज्ञापत्रक सादर करणे.<br>२) विभागामधील अधिकारी/कर्मचारी यांच्या किरकोळ रजा, अर्जित रजा, वैद्यकीय रजा, कुष्टरोग, पक्षघात, विकलांगता, प्रसुती, गर्भपात यांसारख्या विशेष रजा मंजुर करणे.<br>३) विभागामधील अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुद्ध त्यांच्या वर्तनाबाबत ठपका ठेवणे, वेतनवाढ रोखणे व दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार.<br>४) कार्यालयीन व प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवणे.<br>५) सादर झालेल्या प्रकरणांवर कायद्यातील तरतूदी नियम नोंदविणे.<br>६) कायद्यातील तरतूदीनुसार प्रकरणे प्रस्ताव बरोबर आहेत किंवा नाही याची तपासणी करणे.<br>७) वरीष्ठांच्या सुचनेनुसार काम करणे, लिपिकाने सादर केलेल्या प्रस्तावावर आवलोकन करणे व स्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव वरीष्ठांकडे सादर करणे. | १) मा.आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/१/कावि/३६०/२००५ दि.०४/०६/२००५.<br>२) आदेश क्र.पापु/२/कावि/७४४/२००६ दि.२६/११/२००६.<br>३) बीपीएमसी अँक्ट १९४९ चे कलम ६९ (१) व (२) मधील पोट कलम अ, ब, ड, व ई म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील विहीत पद्धतीचा अवलंब करुन कार्यवाही करणे.<br>४) एमसीएसआर (वेतन) व लेखा संहितेनुसार कामकाज व कार्यवाही करणे. | |
| ०४. | कनिष्ठ अभियंता (वि) | १) विद्युत विषयक कामाचे नियोजन करणे.<br>२) कामावर प्रत्यक्ष देखरेख करणे, त्याप्रमाणे कामाचे बील तयार करणे, एम.बी.रेकॉर्ड तयार करणे, तसेच वार्षिक देखभाल दुरुस्तीच्या कामाचे रजिस्टर ठेवणे, जुने साहित्य रजिस्टर ठेवणे.<br>३) अंदाजपत्रक तयार करणे व येणाऱ्या खर्चास तरतुदीनुसार संबंधीत समितीकडुन मान्यता घेणे.<br>४) म.रा.वि.वि.कं.लि. तसेच इतर विभागाशी समन्वय साधुन पत्रव्यवहार करणे, पदाधिकारी व नागरिक तक्रारी व सुचनावर त्वरित कार्यवाही करणे.<br>५) वीजपर्यवेक्षक व तांत्रिक कर्मचारी यांना कामाबाबत सुचना देणे, तसेच स्टॉक रजिस्टर | नियंत्रित अधिकारी यांचे आदेशानुसार. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अद्ययावत करणे.<br>६) लेखापरिक्षण नियमाप्रमाणे कामकाज करणे व अभिलेख जतन करणे.<br>७) माहिती अधिकारासाठी मागणी केलली माहीती उपलब्ध करून देणे. | | |
| ०५. | वीजपर्यवेक्षक | विद्युत विषयक कामकाजावर देखरेख ठेवणे, तांत्रिक कर्मचाऱ्यांना कामकाज वाटप करणे व त्यांचेवर नियंत्रण ठेवणे, विभागांतर्गत कामासाठी लागणारे साहित्य भांडारातुन मागविणे व त्याची नोंद स्टॉक रजिस्टरमध्ये घेणे, पदाधिकारी व नागरीक यांचे तक्रारी व सुचनावर त्वरित कार्यवाही करणे. | नियंत्रित अधिकारी यांचे आदेशानुसार. | |
| ०६. | इलेक्ट्रीशन | रस्त्यावरील विद्युत दिवे व वाहतुक नियंत्रण दिव्यांची देखभाल दुरुस्ती विषयक कामकाज करणे, प्रशासकीय इमारत, शाळा, रुग्णालये, दवाखाने, विद्युत यांत्रिकी उपकरणांची देखभाल व दुरुस्ती करणे, त्यासाठी आवश्यकतेनुसार डिझेलचा साठा ठेवणे, रजिस्टर अद्ययावत करणे. वीजपर्यवेक्षक यांनी दिलेल्या सुचनेनुसार कामकाज करणे. | नियंत्रित अधिकारी यांचे आदेशानुसार. | |
| ०७. | वायरमन | रस्त्यावरील विद्युत दिवे व वाहतुक नियंत्रण दिव्यांची देखभाल दुरुस्ती विषयक कामकाज करणे, प्रशासकीय इमारत, शाळा, रुग्णालये, दवाखाने, विद्युत यांत्रिकी उपकरणांची देखभाल व दुरुस्ती करणे. वीजपर्यवेक्षक यांनी दिलेल्या सुचनेनुसार कामकाज करणे. | नियंत्रित अधिकारी यांचे आदेशानुसार. | |
| ०८. | मुख्य लिपीक | १) लिपिकाचे कामकाजावर पर्यवेक्षीय नियंत्रण ठेवणे व त्याचे कार्यविवरण वरील टपालाच्या नोंदी तपासुन प्रलंबीत पत्रव्यवहार निकाली काढण्याच्या दृष्टीकोनातुन मार्गदर्शन करणे, कार्यालयीन व प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवणे.<br>२) सादर झालेल्या प्रकरणांवर कायद्यातील तरतूदी नियम नोंदविणे, कायद्यातील तरतूदीनुसार प्रकरणे प्रस्ताव बरोबर आहेत किंवा नाही याची तपासणी करणे, वरीष्ठांच्या सुचनेनुसार काम करणे, लिपिकाने सादर केलेल्या प्रस्तावावर अवलोकन करणे व स्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव वरीष्ठांकडे सादर करणे.<br>३) विभागामधील कर्मचारी यांचेविरुद्ध त्यांच्या वर्तणुकीबाबत प्रशासकीय कारवाई प्रस्तावीत करणे, वेतनवाढ रोखणे व दंडात्मक कारवाई करणे. | नियंत्रित अधिकारी यांचे आदेशानुसार. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०९. | लिपीक | १) विद्युत विभागातील आस्थापना विषयक कामकाज.<br>२) शासन निर्णय मनपा धोरण, आदेश, परिपत्रके, स्थायी आदेश विचारात घेऊन नियमानुसार विहीत मुदतीत प्रस्ताव सादर करणे.<br>३) अभिलेख विषयक कामकाज करणे.<br>४) अंदाजपत्रक तयार करणे.<br>५) जंगम मालमत्ता व साठा नोंदवही अद्ययावत करणे.<br>६) सर्व कर्मचा-यांच्या रजा मंजुर, सर्व प्रकारची देयके अदा करणे.<br>७) आवक-जावक व आयकराबाबतचे कामकाज करणे.<br>८) कर्मचारी बेशिस्त वर्तनाबाबत नोटीस काढणे.<br>९) स्थानांतर करणेत आलेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीबाबत प्रशासन विभागाकडुन मागिवणेत आलेली माहीती विहीत वेळेत सादर करणे.<br>१०)वरीष्ठांचे सुचनेप्रमाणे कामकाज करणे. | नियंत्रित अधिकारी यांचे आदेशानुसार | |
| १०. | शिपाई | कार्यालयीन दैनंदीन टपाल, नस्त्या, रजिस्टरर्स यांची कार्यालयांतर्गत व मुख्य कार्यालय येथे ने-आण करणे, कार्यालयातील टेबल-खुर्च्या पुसणे, अधिका-यांकरीता पाण्याची व्यवस्था करणे, वरिष्ठांच्या सुचनेनुसार इतर कामकाज करणे, तसेच कार्यालयातील शिस्तीचे पालन करणे. | नियंत्रित अधिकारी यांचे आदेशानुसार. | |
| ११. | मजूर | उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांचे सुचनेनुसार कामकाज करणे, वीजतंत्री व तारतंत्री कर्मचा-यांना मदत करणे. | नियंत्रित अधिकारी यांचे आदेशानुसार. | |